# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. अभिजीत कुलकर्णी**
**संचालक**


संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/०६ दिनांक : १२/०६/२०२५

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
संलग्नीत महाविद्यालये व परिसंस्था
**फक्त पुणे शहर व पिंपरी–चिंचवड**

**विषय** : २१ जून, २०२५ जागतिक योग दिनानिमित्त पुणे ते पंढरपूर दिंडीमध्ये सहभागी वारकऱ्यांसाठी 'भक्तियोग' उपक्रम मार्गदर्शन बैठकीस अनिवार्यत: उपस्थित राहणेबाबत

**संदर्भ** : महाराष्ट्र शासन परिपत्रक/योग दिन/२०२५/ दिनांक ११ जून, २०२५ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविव्यात येते की, पुणे ते पंढरपूर विठोबाची वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि अध्यात्मीक वैभव आहे. या वर्षी संत ज्ञानोबा आणि संत तुकोबा यांच्या पालख्यांच्या मुक्काम पुणे शहरामध्ये दि. २० व २१ जून २०२५ रोजी असणार आहे. २१ जून हा जागतिक योग दिन म्हणून मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून मूर्त झाला असून, ह्या जागतिक योग दिनाचे हे ११ वे वर्ष आहे.

२१ जून जागतिक योग दिनाचे औचित्य साधुन राज्याचे मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून ह्या वर्षी २१ जून रोजी 'भक्तियोग' ह्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन वारीतील वारकऱ्यांसोबत करण्याचे आयोजिले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे महानगरपालिका आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन संपन्न होणार आहे.

वरील आयोजनासाठी शनिवार, दिनांक १४ जून, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता इरावती कर्वे शैक्षणिक संकुल येथील सभागृहामध्ये मा. नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, मा.डॉ. पराग काळकर, प्र–कुलगुरू, मा. डॉ. सीएमए चारूशिला गायके, प्रभारी कुलसचिव, मा. श्री. राजेश पांडे, सदस्य, राज्य सल्लागार समिती, रासेयो यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक आयोजित केलेली आहे.

तरी सदर मार्गदर्शन बैठकीस आपल्या महाविद्यालयातील **विद्यार्थी कल्याण अधिकारी व २ विद्यार्थी यांनी शनिवार, दिनांक १४ जून, २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता, इरावती कर्वे संकुलातील सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे अनिवार्यत: उपस्थित रहाणेबाबत सूचित करावे. कळावे, ही विनंती.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**नावनोंदणी : दिनांक १३ जून, २०२५ पर्यंत विद्यार्थी कल्याण अधिकारी व २ विद्यार्थी**

**नावनोंदणी लिंक :**
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSekmuBzrvaRaZ0RUV53Ay1vRGgXcFm5u4KHTOnddV_ZIXXisg/viewform?usp=sharing&ouid=107131124500957130754

**महाराष्ट्र शासन**

**सह संचालक (उच्च शिक्षण)**

17 डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, कॅम्प, पुणे-४११००१

Website: www.jdhepune.in E-mail: jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक 020 - 26127833, 020-26051632 फॅक्स क्रमांक 020- 26051632

क्रमांक: परिपत्रक/योग दिन/२०२५/ दिनांक : 11.6.2025

प्रति,

1.कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे 411 007.

2. कुलसचिव,सर्व अभिमत/स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, पुणे शहर.

3.प्राचार्य/प्राचार्या,

सर्व अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान,

विधी, शिक्षणशास्त्र,शारिरीक शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये,

**पुणे शहर.**

**विषय** : **आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त योग कार्यक्रमामध्ये सहभागी होणेवाबत...**

संदर्भ : मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक-उशिसं/मवि-1/भक्ति योग/2025, दिनांक -11.06.2025

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केलेला आहे. सुमारे ५००० वर्षाहून अधिक परंपरा असणारी योग विद्या ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. व्यक्तीच्या शारिरीक आणि आत्मीक विकासासाठी योग विद्या सहाय्यभूत ठरत असल्याचे जगमान्य झाले आहे. त्यामुळेच सन २०१५ पासून (मागील दहा वर्ष) २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो.

दि.२१ जून २०२५ रोजी अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्राच्या संत/वारकरी परंपरेचे भूषण असलेली आषाढी वारी दि. २० जून २०२५ रोजी सुरु होत आहे. दि. २१ जून २०२५ या योग दिनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या तसेच संत परंपरेतील आणखी काही पालख्या पुण्यात विसावणार आहेत.

सदर दिवशी मा. ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील- मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या कल्पनेतून नाविन्यपूर्ण पध्दतीने योग दिन साजरा केला जाणार आहे.

दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ७.०० वा. भक्ती योग उपक्रम - राष्ट्रीय सेवा योजना , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य. २) राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ-पुणे. ३) पुणे महानगर पालीका व ४) देहू आणि आळंदी देवस्थान समित्या यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

या अनुषंगाने आपल्या विद्यापीठे/महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक ,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या योग कार्यक्रमात सहभागी व्हावे. महाविद्यालयाच्या परिसरातील दिंडी मुक्काम ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षकांनी उपस्थित राहून योग दिन साजरा करावयाचा आहे.

योग दिनाचा मुख्य कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री मा. ना. श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार असून तिथून योग प्रशिक्षक व अनेक मान्यवर प्रथितयश विभूती या योगाचे प्रत्याक्षिक ऑनलाईन पध्दतीने सादर करणार आहेत. त्यानुसार दिंडी निवासस्थानाच्या ठिकाणी वारकऱ्यांकडून योगाभ्यास करुन घ्यावयाचा आहे. पुण्यामध्ये जवळपास सहा ते सात लाख वारकरी सहभागी होतील असे अपेक्षित असून पुणे शहरातील सुमारे २०० पेक्षा जास्त महाविद्यालयांनी आणि बहुसंख्येने विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे.

सबब पुणे शहरातील सर्व विद्यापीठे/महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तसेच संस्था चालकांना या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच यासंदर्भात अधिक माहितीसाठी सावित्रीबाई फूले पूणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना किंवा विद्यार्थी विकास मंडळाशी संपर्क साधावा.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 11-06-2025 20:46:01

सोबत- मा.संचालनालयाकडील संदर्भिय पत्र.

**(डॉ.अशोक उबाळे)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग,पुणे-१.

प्रत:- मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ०१६ यांना माहितीसाठी सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेलकॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.**
**Web :**www.dhepune **E-Mail :mavi.** dhepune@gov.in
**फोन नं.**020/26122119 .

क्र.: उशिसं/मवि-१/भक्ति योग/२०२५/ दिनांक: .२०२५

प्रति,
विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे.

**विषय: आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त योगकार्यक्रमामध्ये सहभागी होणेबाबत..**

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केलेला आहे. सुमारे ५००० वर्षाहून अधिक परंपरा असणारी योग विद्या ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. व्यक्तीच्या शारिरीक आणि आत्मीक विकासासाठी योग विद्या सहाय्यभूत ठरत असल्याचे जगमान्य झाले आहे. त्यामुळेच सन २०१५ पासून (मागील दहा वर्ष) २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो.

दि.२१ जून २०२५ रोजी अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्राच्या संत/वारकरी परंपरेचे भूषण असलेली आषाढी वारी दि. २० जून २०२५ रोजी सुरु होत आहे. दि. २१ जून २०२५ या योग दिनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या तसेच संत परंपरेतील आणखी काही पालख्या पुण्यात विसावणार आहेत. सदर दिवशी मा. ना. श्री.चंद्रकांतदादा पाटील- मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या कल्पनेतून नाविन्यपूर्ण पध्दतीने योग दिन साजरा केला जाणार आहे.

दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ७.०० वा. भक्ती योग उपक्रम - राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य. २) राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ- पुणे. ३) पुणे महानगर पालीका व ४) देहू आणि आळंदी देवस्थान समित्या. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

आपल्या विभागातील पुणे शहर अंतर्गत सर्व महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या योग कार्यक्रमात सहभागी व्हावे अशा सुचना आपल्या स्तरावरुन पुणे शहरातील सर्व महाविद्यांलयांना देण्यात याव्यात. महाविद्यालयाच्या परिसरातील दिंडी मुक्काम ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षकांनी उपस्थित राहून योग दिन साजरा करावयाचा आहे.

योग दिनाचा मुख्य कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री मा. ना. श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार असून तिथून योग प्रशिक्षक व अनेक मान्यवर प्रथितयश विभूती या योगाचे प्रत्याक्षिक

ऑनलाईन पध्दतीने सादर करणार आहेत. त्यानुसार दिंडी निवासस्थानाच्या ठिकाणी वारकऱ्यांकडून योगाभ्यास करुन घ्यावयाचा आहे. पुण्यामध्ये जवळपास सहा ते सात लाख वारकरी सहभागी होतील असे अपेक्षित असून पुणे शहरातील सुमारे २०० पेक्षा जास्त महाविद्यालयांनी आणि बहुसंख्येने विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. सबब पुणे शहरातील महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तसेच संस्था चालकांना या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच यासंदर्भात अधिक माहितीसाठी सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना किंवा विद्यार्थी विकास मंडळाशीसंपर्क साधावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 11-06-2025 19:06:25

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षणसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रतः- १. कुलसचिव, सवित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे
२. प्राचार्य, पुणे शहरातील वरिष्ठ महाविद्यालये